**शपथेवर सुरु...**

**पुढील सरतपास – विधिज्ञ श्री.जी.एस. पोळ अर्जदारतर्फे**

१४. आता मला नि.क्र.यु–३/३ वरील कागद दाखविला. सदर कागदावर संघटनेच्या पदाधिका–यांची नावे व पदे नमूद केलेली आहेत. सदर कागद मी स्वतः जनरल सेक्रेटरी म्हणून सही केलेला आहे. त्यास **नि.क्र.यु–१४** देण्यात आला. आता मला नि.क्र.यु–३/४ वरील कागद दाखविला. ती सभासदांची यादी असून ६२ सभासदांची नावे नमूद आहेत. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.यु–१५** देण्यात आला. आता मला नि.क्र.यु–१२/१ वरील कागद दाखविला. ती संघटनेच्या नोंदणीपत्राची खरी नक्कल आहे. ते प्रमाणपत्र अर्जदार संघटनेला दि.२०/०४/२०२२ रोजी उपनिबंधक श्रमिक संघ, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिलेले आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.यु–१६** देण्यात आला. नि.क्र.यु–१२/२ कडे संघटनेची घटनेची खरी नक्कल असून सदर घटनेवर माझी स्वतः व अध्यक्ष श्री दत्तात्रय धर्माजी जगताप यांचे नाव व सही असून त्यावर उपनिबंधक श्रमिक संघ, पुणे यांची सही व शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.यु–१७** देण्यात आला. आता मला नि.क्र.यु–१२/३ कडे हजर केलेली दोन पावती पुस्तके दाखविली. त्या पुस्तकांत माहे जानेवारी २०२३ ते डिसेंबर २०२३ या कालावधीत सभासदांनी दिलेल्या वर्गणीबद्दल त्यांना दिलेल्या पावतीच्या कार्बन प्रती आहेत. त्यावर संबंधित सभासदाची सही व माझी सही आहे. पावती बुक क्र.१ मध्ये १ ते ५० पावत्या असून पावती बुक क्र.२ मध्ये ५१ ते ६३ अशा पावत्या आहेत. त्यास **नि.क्र.यु–१८** एकत्रीतपणे देण्यात आला. आता मला नि.क्र.यु–१२/४ कडे हजर केलेले

संघटना कार्यकारणीचे मिटींगचे इतिवृत्त नोंदविलेले रजिस्टर दाखविले. त्यात दि.२४/०४/२०२२ ते दि.२४/१२/२०२३ या कालावधीतील सर्व मिटींगचे इतिवृत्ते नमूद केली आहेत. त्यावर माझी व इतर पदाधिका-यांच्या सह्या आहेत. सर्व इतिवृत्त संबंधित वेळी झालेल्या मिटींगनुसार लिहिलेली आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.यु-१९** देण्यात आला. आता मला नि.क्र.यु-१२/५ कडे संघटनेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त बुक सादर केले आहे. त्यात दि.२७/०७/२०२२ ते दि.०७/०३/२०२४ या कालावधीत झालेल्या मिटींगची इतिवृत्ते नमूद आहेत. त्यावर माझी व इतर पदाधिका-यांच्या सह्या आहेत. सर्व इतिवृत्ते संबंधितवेळी झालेल्या मिटींगनुसार लिहिलेली आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.यु-२०** देण्यात आला. नि.क्र.यु-१२/६ कडे माहे एप्रिल २०२२ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत अप्पर कामगार आयुक्त कार्यालयास सादर केलेल्या वार्षिक विवरणपत्राची कार्यालयीन प्रत सादर केलेली आहे. त्यावर माझी सही असून ते विवरणपत्र पोहचेबद्दल अप्पर कामगार आयुक्त कार्यालयाचा सही, शिक्का आहे. त्यास **नि.क्र.यु-२१** देण्यात आला. नि.क्र.यु-१२/७ कडे सन २०२३ मध्ये अप्पर कामगार आयुक्त कार्यालयास सादर केलेल्या वार्षिक विवरणपत्राची कार्यालयीन प्रत सादर केलेली आहे. त्यावर माझी सही असून ते विवरणपत्र पोहचेबद्दल अप्पर कामगार आयुक्त कार्यालयाचा सही, शिक्का आहे. त्यास **नि.क्र.यु-२२** देण्यात आला. नि.क्र.यु-१२/८ कडे संघटनेचे पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांचेकडे असलेल्या बँक खात्याचा दि.०१/०१/२०२३ ते दि.०८/१२/२०२३ या कालावधीतील खाते उतारा हजर केलेला आहे. त्यावर बँक

मॅनेंजरची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.यु–२३</u>** देण्यात आला. नि.क्र.यु–१२/९ कडे दाखल केलेला कागद दाखविला. ते चार्टर्ड अकौंटंट लक्ष्मीकांत नगरे यांनी दिलेला दि.०१/०१/२०२३ ते दि.३१/१२/२०२३ या कालावधीतील लेखातपासणीचे प्रमाणपत्र हजर केलेले आहे. त्यासोबत बॅलन्स शीट, नफातोटा पत्रक, जमा खर्च इ.हजर केले आहे. त्यावर चार्टर्ड अकौंटंट लक्ष्मीकांत नगरे यांची सही असून ती मी ओळखतो. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.यु–२४</u>** एकत्रीतपणे देण्यात आला. नि.क्र.यु–१२/१० कडे संघटनेच्या सभासदांचे संगणकात ठेवलेले रजिस्टराची प्रत हजर केली आहे. ते फॉर्म 'जे' मध्ये ठेवले असून सर्व सभासदांची नावे, वर्गणी, तपशिल इ. नमूद आहे. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.यु–२५</u>** देण्यात आला.

**<u>उलटतपासणी – विधिज्ञ श्री जोशी व विधिज्ञ श्री गुंते यांच्या विनंतीवरुन तहकूब..</u>**

सही/–
(दि.मा. पाटील)
सदस्य,
औद्योगिक न्यायालय, पुणे

दि.१३/०२/२०२६.
पुणे.